६. जिल्हा परिषद स्तरावरील/विभागीय आयुक्त स्तरावरील असलेली प्रलंबित प्रकरणे व शासन स्तरावरील प्रलंबित प्रकरणे तत्परतेने निपटारा करण्यांच्या दृष्टीने शासनाने गांभीर्याने विचार केला असून क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे काम न करण्यांचा वा निर्णय न घेण्याचा दृष्टीकोन बदलण्याकरिता उपाय योजना करण्यांचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

७. शासन क्षेत्रिय कार्यालयातील वरिल प्रकार थांबविण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) जिल्हा परिषदांतर्गत कार्यरत गट -क" व गट -ड" मधील कर्मचाऱ्यांच्या <u>वैय्यक्तिक सेवा विषयक</u> बाबी किंवा अशा कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडुन सेवाविषयक केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने त्यांनी प्रथम त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे म्हणजेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे मागणी / अर्ज करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा संबंधीत प्रशासकीय विभाग यांनी या संदर्भात एक महिन्याच्या नियमानुसार कार्यवाही करुन संबंधितांना कळविणे आवश्यक राहील.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हा परिषदेअंतर्गत संबधित प्रशासकीय विभागाने विहीत कालावधीत कार्यवाही करुन घेतलेल्या निर्णयाबाबत (किंवा विशेष कालावधीत निर्णय न घेतल्यास) असमाधान असल्यास त्या शासकीय कर्मचारी किंवा संघटनांनी विभागीय आयुक्तांकडे आवश्यक तो पत्रव्यवहार करणे आवश्यक राहील. विभागीय आयुक्तांनी या संदर्भात ४५ दिवसात आवश्यक त्या सुचना संबधित जिल्हा परिषदेस देणे बंधनकारक असेल.

३) प्रस्तूत दोन्ही पर्यायांचा विचार केल्यानंतरच अशा शासकीय कर्मचारी किंवा संघटनेने शासनाकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक राहील. मात्र शासनाकडे असा पत्रव्यवहार करताना त्या शासकीय कर्मचाऱ्याने किंवा संघटनेने उपरोक्त दोन्ही स्तरावरील कार्यवाहीपर कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील. तसेच असा पत्रव्यवहार करतांना प्रपत्र -अ" मधील परिपुर्ण विवरण पत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

४) मात्र,उपरोक्त नमूद १ व २ येथील पर्यायांचा वापर न करता शासकीय कर्मचाऱ्याने किंवा संघटनेने शासनाकडे थेट पत्रव्यवहार केल्यास शासन स्तरावरुन त्याबाबत विचार करण्यात येणार नाही.

५) कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर ज्या तक्रारीचे निवारण होवू शकणार नाही अशा धोरणात्मक बाबींच्याच अनुषंगानेच शासनाकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक राहील.

६) उपरोक्त क्रमांक १ ते ५ येथील सुचनांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आवश्यक त्या सुचना संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.



Scanned by CamScanner

७) कोणत्याही कर्मचारी संघटनेने पत्रव्यवहार करतांना वैयक्तिक बाबी व धोरणात्मक बाबी याबाबत वेगवेगळा पत्रव्यवहार करावा अशा सुचना सर्व संबंधित संघटनाना प्रत्येक जिल्हा परिषदांनी द्यावा.

८) ज्या प्रकरणात शासन अधिसूचना/ परिपत्रके/ अधिनियम /शासन निर्णय स्वयंस्पष्ट आहेत अशा प्रकरणांत जिल्हा परिषदांच्या विभाग प्रमुखांनी निर्णय न घेता विभागीय आयुक्तांकडे वा शासनाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर केल्यास अशा विभाग प्रमुखांना व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना, विभागीय आयुक्तांनी तात्काळ लेखी समज द्यावी व असा सततचा पत्रव्यवहार निदर्शनास आल्यास त्याचे गोपनीय अहवालत नोंद घ्यावी. याबाबत पुनरावृत्ती झाल्यास संबंधीत विभाग प्रमुख व मुख्य कार्यकारी अधिकारीं विरुध्द योग्य ती कारवाई सुरु करण्यात यावी.

९) वरिल प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उचित निर्णय न घेता वा शासनाच्या वरिल प्रमाणे दिलेल्या सूचनांचा अवलंब न करता असा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे वा शासनाकडे मार्गदर्शनासाठी पाठविण्याकरिता प्राप्त झाल्यास विभागीय आयुक्तांनी अशा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तात्काळ लेखी समज द्यावी व प्रस्ताव निर्णयार्थ जिल्हा परिषदांकडे परत पाठविण्यात यावेत.

१०) मात्र विभागीय आयुक्त कार्यालयाकडून वरील प्रमाणे कार्यवाही न करता शासनाकडे प्रस्ताव सादर झाल्यास संबंधित उप आयुक्त (आस्थापना)/(विकास) यांना जबाबदार धरण्यात येईल.

११) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गाबाबतचे आस्थापना विषयक कामकाज हाताळतांना थेट प्रस्ताव शासनाकडे सादर करु नये. प्रचलित कार्यपध्दतीनुसार आवश्यकता असल्यास कोणत्याही परिस्थितीत विभागीय आयुक्तांमार्फतच शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून शासनाकडे थेट पाठविलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत ते परत पाठविण्यात येतील. याची वारंवारता निदर्शनास आल्यास संबंधितांना थेट जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यांत येईल.

१२) विभागीय आयुक्त कार्यालयांनी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव प्रचलित नियम/अधिनियम / परिपत्रके/ शासन निर्णय इत्यादिंचा विचार करुन व प्रस्तावांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदांना मार्गदर्शन करावयाचे आहे. एखादी बाब नव्याने उपस्थित झाली असल्यास अशाच बाबत शासनाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर करावेत.

१३) जे प्रस्ताव शासनाने निर्णय घेणे कायदेशीररित्या वा धोरणात्मक निर्णयाद्वारे बंधनकारक केलेले आहे असे प्रस्ताव जिल्हा परिषदांनी विभागीय आयुक्तांच्या मार्फत शासनाकडे पाठवावेत.



Scanned by CamScanner

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२१८१३१४४६२०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Eknath Kulkarni

Digitally signed by Anil Eknath Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Anil Eknath Kulkarni
Date: 2015.02.21 17:09:07 +05'30'

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सर्व विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,

२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा

३) सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

४) कार्यासन आस्थापना-१० संग्रहार्थ.



Scanned by CamScanner

विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषदाकडून या विभागाकडे आस्थापना विषयक बाबीकरिता करण्यांत येणारा <u>अनावश्यक पत्रव्यवहार.</u>

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जिपआ-२०१४/प्र.क्र.३२८/आस्था.१०**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक: २१ फेब्रुवारी,२०१५**

## शासन परिपत्रक

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालयीन स्तरावरील प्रशासकीय विभाग आहे. या विभागाकडून शासनाचे धोरण /नियम/नियमावली/ परिपत्रके/ शासन निर्णय नव्याने अस्तित्वात येणारे अधिनियम व प्रचलित अधिनियमातील दुरुस्त्या याद्वारे राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व विभागीय आयुक्त कार्यालयांना प्रशासकीय विभाग म्हणून आदेश/ सूचना दिल्या जातात. त्याद्वारे जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रशासकीय कामकाज चालविणे अभिप्रेत आहे.

२. आस्थापना विषयक बाबीचे कामकाज पाहताना शासनाने प्रत्येक संवर्गाचे सेवाशर्ती नियम,धोरणात्मक निर्णय घेतलेले असून त्याद्वारे स्वयंस्पष्ट मार्गदर्शक सूचना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना व विभागीय आयुक्त कार्यालयांना दिलेल्या आहेत.. सामान्य प्रशासन विभागाकडून घेतले जाणारे धोरणात्मक निर्णय,शासन निर्णय वा परिपत्रकाद्वारे शासनाच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना कळविले जातात. यामध्ये संबंधीत शासन निर्णय/परिपत्रक जिल्हा परिषदांना लागू आहे किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट उल्लेख केलेला असतो.

३. मात्र मागील बऱ्याच कालावधीपासून असे निदर्शनास आले आहे की, सेवाशर्ती नियम/ शासन निर्णय/ परिपत्रके याद्वारे स्वयंस्पष्ट सूचना /मार्गदर्शक सूचना दिलेल्या असतांनाही त्याबाबतचा योग्य तो अभ्यास न करता जिल्हा परिषदांकडून विभागीय आयुक्तांमार्फत वा थेट शासनाकडे संदर्भ केले जातात व मार्गदर्शन करण्याची विनंती केली जाते. वास्तविक अशा पध्दतीने संपूर्ण महाराष्ट्रातील अधिनस्त कार्यालयांनी कोणताही निर्णय न घेता थेट शासनाकडे मार्गदर्शन घेण्याचे ठरविल्यास, शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अवधी उरणार नाही. शासन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आहे. एखादया मुद्दयावर कोणतीही मार्गदर्शक सूचना नसतील तर त्यावेळी शासनाकडे संदर्भ केल्यास ती बाब समजून घेता येईल. परंतु अलिकडच्या काळात जिल्हा परिषदांमधील वेगवेगळया विभागाच्या, विभाग प्रमुखाकडून शासनाकडे प्रचलित नियम/ अधिनियम न तपासता संदर्भ केले जातात. त्यामुळे शासनस्तरावर शासनाच्या नियमित कामकाजावर परिणाम होत आहेत. जिल्हा परिषदाकडील विभाग प्रमुखांचा प्रचलित नियम अधिनियमाद्वारे दिलेले

Scanned by CamScanner

मार्गदर्शक सूचनांचा आधार घेऊन निर्णय न घेता शासनाकडे पत्रव्यवहार करणे म्हणजे शासनाने नेमून दिलेले काम टाळणे व नाकारणे एवढेच त्यातून अभिप्रेत होते.

४. जिल्हा परिषदाकडील विभाग प्रमुखाकडून अशा प्रकारे काम टाळण्याच्या प्रवृत्तीला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लगाम घालणे आवश्यक आहे. हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. मात्र येथे खेदाने नमूद करण्यांत येते की, जिल्हा परिषदांच्या विभाग प्रमुखांना त्यांचे काम टाळण्याच्या वा निर्णय न घेण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्या ऐवजी संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून असे प्रस्ताव विभागीय आयुक्तामार्फत वा थेट शासनाकडे सादर केले जातात. वास्तविक पाहता स्थानिक प्रश्न जिल्हा परिषद स्तरावरच सोडविले जाणे आवश्यक असतांना असे अवाजवी प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त होणे म्हणजे जिल्हा प्रशासनाच्या कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करते. या उपरोक्त जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रसंगानुरुप विभागीय आयुक्तांकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांची सेवाविषयक प्रकरणे शासनस्तरावर अपवादात्मक परिस्थिती किंवा धोरण निश्चिती व्यतिरीक्त उद्भवणे अनावश्यक आहे. तथापी, अशा स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये गैरवाजवी शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यात येते. बहुतांशी असे वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी थेट रित्या शासनाकडे व्यक्तीशः उपस्थितीव्दारे वा पत्रव्यवहाराव्दारे दाद मागतात. तसेच जिल्हा प्रशासनाकडूनही बऱ्याचवेळा अशा कर्मचाऱ्यास शासनाकडुन आदेश आल्यास काम होईल असे सांगितले जाते असेही निदर्शनास आले आहे. या बाबींमुळेही अकारणपणे वेळेचा अपव्यय होतो. ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे.

५. ज्या मुदया संदर्भात शासनाचे आदेश/ नियम/ अधिनियम अस्तित्वात आहेत अशा मुद्यांवर विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर झालेले प्रस्ताव उप आयुक्त ( आस्थापना) विकास कार्यालयाकडून न तपासता टपालने शासनाकडे पुढे पाठविले जातात. वास्तविकतः विभागीय आयुक्त कार्यालयाने त्यांच्या स्तरावर असे प्रस्ताव तपासून व ते शासनाकडे पाठविणे अनावश्यक आहे असे दिसून आल्यास तसे प्रस्ताव जिल्हा परिषदांकडे परत पाठविणे अभिप्रेत आहे. मात्र हे प्रस्ताव काहीही तपासणी न करता शासनाकडे थेट अग्रेषित केले जातात. ही प्रवृत्ती गतीमान प्रशासनासाठी घातक आहे. विशेषतः आस्थापना विषयक कामकाज हाताळतांना अशा पध्दतीने क्षेत्रिय स्तरावर काम हाताळले जात असल्याने बरेचशे अधिकारी/ कर्मचारी थेट न्यायालयात धाव घेतात. त्याच बरोबर अशा न्यायालयीन प्रकरणी बहुतांशी वेळा कर्मचारी वर्ग-३ व ४ चे असल्याने व नियुक्ती प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याने शासन अनौपचारिक प्रतिवादी असते. मात्र अशा प्रकरणी देखिल बऱ्याच न्यायालयीन प्रकरणात शासनाकडुन प्रतिज्ञापत्राच्या प्रारुपास मंजुरी देणेबाबत विनंती करण्यात येते. या संदर्भातही दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच कामगार किंवा औद्योगिक न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांसंदर्भात पुरेसा पाठपुरावा न झाल्यामुळे न्यायनिर्णय सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी घेणे आवश्यक राहील अन्यथा यासंदर्भात निर्णयाच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सर्व संबंधित विभागप्रमुखांना आदेश देवून सर्व न्यायालयीन प्रकरणांचा आढावा प्रत्येक तिमाहीत घ्यावा.



Scanned by CamScanner